‘‘नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील ज्ञानरचनावादी उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे’’ एक चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्याशाखेअंतर्गत
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) शिक्षणशास्त्र पदवीसाठी करावयाचा
संशोधन आराखडा

संशोधक

श्रीमती करुणा एकनाथराव आवरगंड

एम.ए.(इतिहास) एम.एड.सेट

स.शि.जि.प.प्रा.शा. हिप्परगा (जा.)

ता.नायगांव जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुलभा मुळे

सहाय्यक प्राध्यापक

एम.ए.सी.एम.एड. (पीएच.डी.) सेट

शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

संशोधन केंद्र

शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

सन २०१८

अनुक्रमणिका

अ.क्र	तपशील	पृष्ठ क्र
१.	प्रस्तावना	१
२.	समस्या विधान	२
३.	समस्येचे स्पष्टीकरण	३
	३.१ समस्येचे संकल्पनात्मक विश्लेषण	३
	३.२ संशोधनातील शब्दसमूहाच्या कार्यात्मक व्याख्या	४
	३.३ संशोधनाची व्याप्ती	४
	३.४ संशोधानाची मर्यादा	५
	३.५ संशोधानाची गृहीतके	५
४.	संशोधनाचे महत्त्व	६
५.	संशोधनाची उद्दिष्टे	७
६.	संशोधनाची परीकल्पना	८
७.	संशोधनाची चले	८
८.	संशोधनाची कार्यपद्धती	८
	८.१ संशोधन पद्धती	८
	८.२ संशोधन साधने	८
	८.३ संशोधनासाठी नमूना निवड	८
	८.४ संशोधन नमूना निवड पद्धती	९
	८.५ सामग्री विश्लेषण पद्धती	९
९.	संशोधनासाठी प्रकरण योजना	९
१०	वेळापत्रक	९
११	संदर्भ ग्रंथ सूची	१०

''नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील ज्ञानरचनावादी उपक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे'' एक चिकित्सक अभ्यास

१. प्रस्तावना :

शाळा ही समाजाने निर्माण केलेली एक सामाजिक संस्था आहे. औपचारिकरित्या भावी पिढीला ज्ञान देवून जीवन जगण्यास समर्थ करणे असे शाळेचे स्वरुप आहे. शाळा हे शिक्षणाचे मंदिर आहे. तर शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. शिक्षणामुळेच विद्यार्थ्यांचा समाजाचा व एकूण राष्ट्राचा सर्वांगीण विकास होतो. बदलत्या समाजाच्या गरजांना समर्थपणे तोंड देवू शकणारी शिक्षणप्रणालीही प्रवाही बदलती असावी. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ज्ञानाचा प्रस्फोट झालेला दिसून येतो. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. शिक्षण क्षेत्रात अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया अधिक फलदायी, आनंददायी व्हावी यासाठी सातत्याने नवनवीन बदल, प्रयोग होत असतात.

तसाच एक बदल राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखाडा NCF 2005 मध्ये वर्तमान अध्यापनातील शिक्षकाची एकाधिकारशाही अध्यापन पद्धती बदलण्यासाठी ज्ञानरचनावादाचा पुरस्कार केला. NCF 2005, राज्य अभ्यासक्रम आराखाडा २०१०, पुनरचित अभ्यासक्रम २०१२ मध्ये ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापनाचे महत्त्व सांगितले आहे.

''विद्यार्थी हाच ज्ञानाचा रचिता असतो'' विद्यार्थी हा केवळ ज्ञानाचा स्वीकार कर्ताच नसून तो ज्ञानाचा निर्माता, रचनाकर्ता व वापरकर्ताही आहे. मुले स्वतःच स्वतःच्या ज्ञानाची निर्मिती करतात. यावर ज्ञानरचनावादी तत्त्वज्ञान आधारलेले आहे.

प्राथमिक स्तरावर पुनर्रचित अभ्यासक्रम २०१२ नुसार इयत्ता १ ली ते ८ वी साठी ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापनाचे महत्त्व सांगितले आहे. तसेच जीवनशिक्षण मासिकांतून त्याविषयीचे लेख प्रसिद्ध होऊ लागले.

मग ज्ञानरचनावाद आताच का ? एकदम कोठून आला ? ज्ञानरचना म्हणजे नेमके काय ? या पद्धतीची उपयुक्तता काय ? ज्ञानरचनावादी उपक्रम कोणते ? या उपक्रमामुळे

विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर कसा व कितपत परिणाम होतो ? हे उपक्रम राबवितांना कोणत्या अडचणी आल्या ? अशा अनेक शंका मनात आल्या आणि त्यावरच संशोधन करावे असे संशोधिकेने निश्चित केले.

२. समस्या विधान :

''नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील ज्ञानरचनावादी उपक्रमांची परीणामकारकता अभ्यासणे''

२. समस्येचे स्पष्टीकरण :

३.१ समस्येचे संकल्पनात्मक विश्लेषण :







३.२ संशोधन शब्द समूहाच्या कार्यात्मक व्याख्या :

नांदेड -

महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्याचे एक ठिकाण. महाराष्ट्र लॅन्ड रेव्हिन्यू कोड १९६६ प्रमाणे प्रस्थापित झालेल्या औरंगाबाद महसूली विभागातील नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र निश्चित झाले आहे. त्यातंर्गत १६ तालूके येतात.

२. प्राथमिक स्तर :

NCERT ने निर्धारित केलेल्या शालेय स्तरानुसार इयत्ता १ ली ते ८ वी हा प्राथमिक स्तर आहे. त्यात १ ते ५ हा निम्न प्राथमिक स्तर व ६ ते ८ हा उच्च प्राथमिक स्तर आहे.

३. ज्ञानस्वनावाद (Constructivism):

१) पूर्वज्ञानाच्या / पूर्वानुभवांच्या आधारे जेव्हा व्यक्ती नवीन संकल्पना / संबोधाची रचना करते, तेव्हा त्यातून सार्थ असे अध्ययन घडते या विचारधारेस ज्ञानरचनावाद असे म्हणतात.

२) ज्ञानरचनावाद हा एक अध्ययनाचा प्रकार आहे की, जो अध्ययनार्थी स्वतः स्वतःच्या ज्ञानरचना प्रक्रियेतून साकारतो. म्हणजेच अध्ययन दृष्टीने व्यक्तीची स्वयंशोधक, स्वयंनियमक जिज्ञासू, ज्ञाननिर्माता व उपासक वास्तव अनुभवांची चिकित्सा व विचारमंथन करणारी भूमिका असल्याचे स्पष्ट होते.

कॅशमॅनेट

३) Constructivism is a philosophy of learning founded on the premise that, the reflecting on our experiences,we construct our own understanding of the world we live in - Broks and brooks.

4) According to constructivism, learning is on active process in which learners construct their own meaning based on prior knowledge and experience.

४) ज्ञानरचनावादी उपक्रम :

विद्यार्थ्यांच्या भाषा, विज्ञान, गणित, सामाजिकशास्त्रे, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी संबंधी अध्ययन क्षमता संपादणूकीसाठी राबविले जाणारे विविध उपक्रम जसे की, भाषा – कृतीयुक्त कविता गायन, कृतीयुक्त बाराखडी, शब्दकोडे सोडवणे.

गणित – action words, making english sertences

विज्ञान – प्रयोग, निरीक्षण, वर्गीकरण.

सा.शास्त्रे – वर्गमंत्रीमंडळ, विचार करा तक्ते भरा, नाट्याकारण

व्यक्तिमत्व विकास – राखी तयार करणे, परिपाठ सहशालेय उपक्रम.

५) चिकित्सक अभ्यास –

ज्ञानरचनावादी उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादणूकीवर झालेल्या परिणामांचा सूक्ष्मपणे केलेला अभ्यास.

३.३) संशोधनाची व्याप्ती –

क्षेत्र व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात संपूर्ण नांदेड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व प्रकारच्या शाळांचा समावेश केला उदा. जि.प.खाजगी, नगरपालिका.

कालावधी व्याप्ती

प्रस्तुत संशोधन ज्ञानरचनावादी उपक्रमांची निम्न प्राथमिक स्तर इयत्ता १ ते ५ वी साठी परिणामकारकता अभ्यासणे यांच्याशी संबंधीत आहे.

आशय व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन ज्ञानरचनावादी उपक्रमांची निम्न प्राथमिक स्तर इयत्ता १ ते ५ वी साठी परिणामकारकता अभ्यासणे याच्याशी संबंधित आहे.

नमुना व्याप्ती :

सदर संशोधन नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यामधील प्रत्येकी ५ शाळा यांच्याशी संबंधित आहे.

३.४ संशोधनाची मर्यादा :

क्षेत्र मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. इतर जिल्ह्यांचा यात समावेश नाही.

कालावधी मर्यादा :

सदर संशोधन हे २०१७-२० या कालावधीत करण्यात येईल.

आशय मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे फक्त प्राथमिक स्तरावरील ज्ञानरचनावादी उपक्रमांची परिणामकारकता यांच्याशी संबंधीत आहे.

नमूना मर्यादा :

सदर संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातील प्रत्येकी ५ शाळा ही नमूना मर्यादा आहे.

३.५ संशोधनाची गृहीतके :

१) अभ्यासक्रम काही वर्षांनी बदलत असतो त्यात नवीन बदल होत असतात, काळानुरूप बदलत जाणाऱ्या नवनवीन संकल्पनांचा त्यात समावेश केला जातो तो पुनरीचित होतो.

२) ज्ञानसंपादन - आकलन व रचना म्हणजेच अध्ययन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

३) NCF-2005, SCF-2010 व पुनरीचित अभ्यासक्रम २०१२ चा ज्ञानरचनावाद गाभा आहे.

४) संशोधनाचे महत्त्व :

अन्न, वस्त्र, निवारा ह्या मानावाच्या मुलभूत गरजासोबतच शिक्षण ही एक महत्त्वपूर्ण गरज आहे. समृद्ध व सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी शिक्षण ही काळाची गरज आहे. शिक्षणाचे महत्त्व जाणूनच भारत सरकारने RTE - ACT 2009 नुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे.

शिक्षण हे सक्तीचे व मोफत केले आहे तरीही विद्यार्थी शिकत आहेत काय ? गुणवत्ता पूर्ण शिक्षण त्यांना मिळत आहे काय ? सद्यस्थितीचा विचार केला तर आजही बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थी हे निष्क्रिय श्रोत्यांचीच भूमिका करीत आहेत. त्यामुळे Quality वाढत आहे परंतु quality education कुठेतरी कमी पडत आहे.

म्हणूनच NFC 2005 मध्ये अभ्यासक्रमात बदल सुचवितांना ज्ञानरचना वादाचा पुरस्कार केला आहे. विद्यार्थ्याला शाळेतील ज्ञान बाहेरच्या जगाशी जोडता आले पाहिजे. घोकमपट्टीतून शिक्षणाची सोडवणूक व्हावी शिक्षण हे पाठ्यपुस्तक केंद्रीत न राहता मुलांच्या वाढीसाठी त्याचा उपयोग व्हावा. हे संक्रमित नसून संरचित आहे व त्यावरच आधारित पुनर्रचित अभ्यासक्रम २०१२ तयार करण्यात आलेला आहे.

(Constructivism) ज्ञानरचनावाद ही संकल्पना to Construct या क्रियापदापासूनच समोर आली आहे. त्याचा अर्थ रचना करणे किंवा मांडणी करणे असा होतो. ज्ञानाची रचना करण्याची प्रक्रिया कार्यान्वित ठेवणे हा ज्ञानरचना वादाचा मुख्य गाभा आहे. व्यक्तींच्या ठिकाणी निरंत चालणारी ज्ञानरचनेची प्रक्रिया व ज्ञाननिर्मिती यातील त्याची सक्रीयता यावरच ज्ञानरचनावादाचा विश्वास आहे. अनुभवांच्या अवबोधातून मानसिक रचना साकारत असून वास्तवतेचे स्वरुप हे बहुविध, रचनात्मक, पुर्णांरा व प्रमाणबद्ध असते असे ज्ञानरचनावादी विचार धारेत गृहीत धरले आहे.

ज्ञानरचनावादी वर्गात विद्यार्थ्यांचेही ज्ञानसंघटन व्हावे यावर भर असतो. यादृष्टीने चर्चा, गटचर्चा, पृच्छातंत्र सहकार्यात्मक अध्ययन, समस्याविमोचन, प्रकल्प पद्धती, स्वयंशोधन, वास्तव शोधन आदी उपक्रमांचा वापर केला जातो. ज्ञानात्मक संघटन प्रकियेसाठी वर्गीकरण, विश्लेषण संश्लेषण, सहकार्य अध्ययन, बुद्धीमंथन इ. कार्यनितीची मदत होते. एखाद्या संकल्पनेच्या अनुषंगाने शब्दजाळे तयार करणे, संकल्पना चित्रण करणे, मुक्त प्रश्न, बद्ध प्रश्न तयार करणे इ. उपक्रमांचा यात वापर केला जातो.

प्रस्तुत संशोधनामुळे ज्ञानरचनावाद म्हणजे काय ? ज्ञानरचनावादी उपक्रम, त्या उपक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणूकीवर होणारा परिणाम, एकंदर व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम, उपक्रमांची उपयुक्तता, परिणामकारकता कल याचा विचार होईल. व येथून पुढेही ज्ञानरचनावाद उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा विकास होण्यास चालना मिळेल या सर्व बाबींसाठी या संशोधनाला खूप महत्त्व आहे.

५) संशोधनाची उद्दिष्टे :

१) नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावर राबविल्याजाणाऱ्या ज्ञानरचनावादी उपक्रमांचा शोध घेणे.

२) ज्ञानरचनावादी उपक्रमांचा भाषा, गणित, विज्ञान व सामाजिकशास्त्रे या विषयातील अध्ययन संपादणूकीवरील परिणाम कारकतेचा शोध घेणे.

३) ज्ञानरचनावादी उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.

४) ज्ञानरचनावादी उपक्रम अंमलबजावणीतील अडचणींचा शोध घेणे.

६) संशोधनाची परिकल्पना :

१) नांदेड जिल्ह्यात प्राथमिक स्तरावर विविध ज्ञानरचनावादी उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते.

२) ज्ञानरचनावादी उपक्रमांमुळे भाषा, गणित, विज्ञान, विज्ञान, सामाजिकशास्त्रे या विषयाच्या अध्ययन संपादणूकीवर अनुकूल परिणाम होतो.

३)   ज्ञानरचनावादी उपक्रमांमुळे व्यक्तिमत्व विकासावर अनुकूल परिणाम होतो.

४)   ज्ञानरचनावादी उपक्रमांच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी येत असाव्यात.

शून्य परिकल्पना

ज्ञानरचनावादी उपक्रमांतून अध्ययन व पारंपरिक अध्ययन अध्यापनात काहीही फरक नाही.

७)   संशोधनाची चले

स्वाश्रयी चल

ज्ञानरचनावादी उपक्रम

आश्रयी चल

विद्यार्थ्यांच्या विविध विषयांच्या अध्ययन संपादणूकीवर होणारा परिणाम.

८)   संशोधनाची कार्यपद्धती

८.१ संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन कार्यात प्रामुख्याने शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला जाणार असल्यामुळे शिक्षणाशी संबंधित शाळा ही संस्था माणून येथे शालेय सर्वेक्षण ही पद्धती निवडली आहे.

८.२ संशोधन साधने

१)   प्राथमिक शिक्षकासाठी प्रश्नावली

२)   तज्ञ अधिकाऱ्यांच्या मुलाखती

३)   निरीक्षण तंत्र- पदनिश्चयन श्रेणी

८.३ नमूना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यामधील सर्व प्राथमिक शाळा व त्यातील कार्यरत सर्व शिक्षक ही जनसंख्या आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिका १६ तालुक्यातील प्रत्येक ५ शाळा व त्यातील कार्यरत शिक्षण यांची नमूना म्हणून निवड करणार आहे.

८.४ संशोधन नमूना निवड पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी नमूना निवडण्यासाठी सूगम यादृच्छिका पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

८.५ सामुग्री विश्लेषणासाठी पद्धती

सदर संशोधन सामग्री विश्लेषणासाठी टक्केवारी या तंद्धाचा वापर करण्यात येणार आहे.

९. संशोधन अहवालाची प्रकरण योजना :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे प्रकरण योजना करण्यात येईल.

प्रकरण १) प्रस्तावना

प्रकरण २) संबंधित साहित्याचा आढावा

प्रकरण ३) संशोधन पद्धती

प्रकरण ४) माहितीचे संकलन, विश्लेषण, अर्थनिर्वचन

प्रकरण ५) सारांश – निष्कर्ष व शिफारशी

१०. वेळापत्रक

जून २०१७ ते ऑक्टो.२०१७ – विषयनिश्चिती व संशोधन आराखडा

नोव्हें. २०१७ ते मे २०१८ – विषयाच्या अनुषंगाने वाचन.

जून २०१८ ते ऑक्टो.२०१८ – प्रकरण १ व प्रकरण २ अभ्यास

नोव्हें.२०१८ ते मे २०१९ – नमुना निवड व पत्रव्यवहार

जून २०१९ ते ऑक्टो २०१९ – प्रत्यक्ष अंमलबजावणी – सांख्यिकी माहिती गोळा करणे.

नोव्हें.२०१९ ते मे २०२० – सांख्यिकी विश्लेषण, अन्वयार्थ निष्कर्ष टंकलेखन

११. संदर्भग्रंथ सूची :

१. भिंताडे वी.रा. (२००६) शैक्षणिक संशोधन पद्धती नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

२. हांडेकर रेणू, (२०१४) शिकू या आनंदे, मनोविकास प्रकाशन, पुणे.

३. डॉ.रवी जाधव व गौतम गायकवाड, (२०१५), शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

४. माध्यमिक शिक्षकांचे वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षण मार्गदर्शिका २०१४ (म.रा.शै.सं.व प्र.प. पुणे)

५. शिक्षण प्रशिक्षण मार्गदर्शिका इयत्ता ४ थी (म.रा.शै.सं.व.प्र.प.पुणे)